देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ, नेवासा क्षेत्रातील मुलभूत सुविधा निर्माण करण्याचा विकास आराखडा.

आराखड्यातील कामांना दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१६/प्र.क्र.३७/का.१४४४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
तारीख: ८ डिसेंबर, २०१७

संदर्भ

१) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवी-२०१०/प्र.क्र.१३/का.१४४४ दि. ६ जुलै, २०१०

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवी-२००९/प्र.क्र.१३/का.१४४४ दि. १५ जून, २०११

३) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवी-२०१०/प्र.क्र.१०९/का.१४४४ दि. १२ सप्टेंबर,२०१४

४) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवी-२०१६/प्र.क्र.३७/का.१४४४ दि.२४ जून, २०१६

५) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र. तीक्षेवी/आरा/मुदतवाढ/प्र.क्र.१२५/३०४/२०१७, दि. २७ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना -

देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ, नेवासा क्षेत्रातील मुलभूत सुविधा निर्माण निर्माण करण्यासाठी संदर्भाधीन अनुक्रमांक ४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित आराखड्यातील कामे पूर्ण करण्यास दि. ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित आराखडयातील प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी, पुणे, सोलापूर व सातारा जिल्ह्यातील कामासाठी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यास व त्यानंतर कामे करण्यास कालावधी लागणार असल्यामुळे, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या संदर्भीय दि. २७ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरून या आराखड्यातील कामे पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ, नेवासा क्षेत्रातील मुलभूत सुविधा निर्माण निर्माण करण्यासाठी संदर्भाधीन अनुक्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार सुधारित आराखड्यातील कामे पूर्ण करण्यास दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८११२३५४१९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Maya Roop Vasudeo
Date: 2017.12.08 11:26:59 +05'30'

(मा. रु. वासुदेव)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री
२. मा. मंत्री(वित्त व नियोजन)
३. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन)
४. मा. पालकमंत्री, पुणे/सोलापूर/सातारा/अहमदनगर
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई.
७. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
८. जिल्हाधिकारी, पुणे/सोलापूर/सातारा/अहमदनगर
९. महानगरपालिका, पुणे
१०. मुख्यकार्यकारी अधिकारी,पंढरपूर/आळंदी/सोलापूर/सातारा/अहमदनगर नगरपालिका
११.कार्यकारी अधिकारी, देहू
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/सोलापूर/सातारा/अहमदनगर
१३.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे/सोलापूर/सातारा/अहमदनगर
१४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विबाग, पुणे
१५.वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई
१६. नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई
१७.निवड नस्ती, का. १४४४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.